# प्रेस नोट

ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

दि.२७.०७.२०२२

आलोसे मगन गोमा भोई, वय–५२ वर्षे, व्यवसाय–नोकरी,शिपाई तहसिलदार संजय गांधी निराधार योजना, अ वर्ग महानगरपालिका क्षेत्र कार्यालय,जळगांव (खाते महलुल विभाग वर्ग–४) यांना २,०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम त्यांनी स्वत: स्वीकारंताना ला.प्र.विभाग,जळगांव यांची कारवाई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद कमांक** | :– | जळगांव शहर पो.स्टे. गु.र.नं.०२३३/२०२२ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | मगन गोमा भोई, वय–५२ वर्षे, व्यवसाय–नोकरी,शिपाई तहसिलदार संजय गांधी निराधार योजना, अ वर्ग महानगरपालिका क्षेत्र कार्यालय,जळगांव, रा.गट नं.१६५, प्लॉट नं.३, जिजाऊ नगर, वाघ नगर जवळ,जळगांव **(खाते महसुल विभाग वर्ग–४)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.२७/०७/२०२२ प्रथम ५,०००/–रुपये व तडजोडीअंती ४,०००/–रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी तक्रारदार यांचे आईचे अनुदान मंजुर करुन आणुन देणेसाठी प्रथम २०००/–रुपये |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | २,०००/–रुपये. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.२७/०७/२०२२ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील तक्रारदार यांनी त्यांचे स्वत:चे व त्यांच्या आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत अर्थसहाय्य अनुदान मंजुर होण्यासाठी तहसिलदार संजय गांधी निराधार योजना, अ वर्ग महानगरपालिका क्षेत्र कार्यालय,जळगांव यांचेकडेस दि. ०६.१०.२०२१ रोजी अर्ज सादर केले होते. परंतु सदर अर्जावर ०५ महिन्यांचा कालावधी होवुन देखील काहीही कारवाई झाली नाही म्हणुन तक्रारदार यांनी सुमारे ०७/०८ दिवसांपुर्वी सदर कार्यालयात जावुन आलोसे यांची भेट घेवुन प्रकरणांबाबत विचारपुस केली असता आलोसे यांनी तक्रारदारास तुमचे व तुमच्या आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत मिळणाऱ्या अनुदान मंजुरीचे काम करुन आणुन देण्यासाठी आईच्या कामाचे ३०००/–रुपये व तुमच्या कामाचे २०००/–रुपये असे एकुण ५०००/–रुपये लाच मागणी केली.त्याबाबत तक्रारदार यांनी दि.२७/०७/२०२२ रोजी ला.प्र.वि.जळगांव कार्यालयाकडे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची दि.२७.०७.२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव पथकाने पंच साक्षीदार समक्ष पडताळणी केली असता यातील आलोसे यांनी तक्रारदार यांच्या आईचे संजय गांधी निराधार योजने अंतर्गत अर्थसहाय्य अनुदान मंजुरीचे काम करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष तडजोडीअंती २०००/–रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. त्यानंतर आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडुन २०००/–रुपये लाचेची रक्कम वर नमुद वेळी व ठिकाणी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:**– ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:**– dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:**– acbmaharastra.gov.in

**टोल फ्री कमांक:**– 1064,**दुरध्वनी कमांक:**–0257-2235477

**व्हॉटस्अॅप कमांक:**– 8766412529

28.7.2022